# तव जन्माने आम्हा हरदेवा

तव जन्माने आम्हा हरदेवा
जन्म मिळाला पुन्हा
लाभले संजीवन जीवना ||धृ||

गेले विरूनी द्वैत दंभ
गुरू पुजेचा होता आरंभ
जन्मोजन्मीच्या झणीच मुक्ल्या
मरणाच्या यातना................ ||१|| लाभले

तव जन्माने दुविधा पळाली
स्वहिताची दिशा मिळाली
परोपकार हा मनी जागला
सद्भक्ती भावना..............||२|| लाभले

तव ज्ञानाचे कळाले महत्त्व
अंगिकारीले जेंव्हा एकत्व
या जीवनाचे उपवण फुलले
घेता दिव्य गुणा.................||३|| लाभले

तव जन्माने धन्य जहालो
जगी 'एकनाथा' जन्मा आलो
आता निशिदिन पुजा वंदन
मानू तव वचना ................||४|| लाभले